
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं ४१

# …हात्म्य.



REFBK 0019427
REFBK-0019427

किंमत अडीच आणे.

# टिळक माहात्म्य.

REFBK-0019427
REFBK-0019427

## फटका.

१

आर्यभूमिचा टिळक टिळक तो
चमकुन गेला विजेपरी ।
नृपा न वाटो कृपा तयाची
जपातपाहुनि थोर तरी ॥ ध्रु० ॥
सन अठराशें छप्पन्नामधिं
बाळ जन्मला टिळक कुळीं ।
नर केसरिची सरी न कोणा
ऐसा झाला अतुर्बळी ॥ १ ॥
जन्मभूमि ती रत्नागिरि परि
चिखलगांवचे रहिवाशी ।
खोती होती वंशपरंपर
घरची थोडीशी त्याशीं ॥ २ ॥

पुण्यपत्तनीं हर्षें येती
        वर्षं होतां दहा पहा ।
षोडशवर्षी म्याट्रिक झाले
        बालबुद्धिही तीव्र महा ॥ ३ ॥
डेक्कन कॉलेजांत जाउनी
        बी. ए. ही झाले पास ।
एल्. एल्. बी. ची देति परीक्षा
        तोही करुनी अभ्यास ॥ ४ ॥
शक्ती वाचूनि युक्ती वाचुनि
        विद्येचा उपयोग नसे ।
म्हणुनी तालिम करतां अंगीं
        सामर्थ्याचें तेज दिसे ॥ ५ ॥
कांती पाहुनि भ्रांति पडे कीं
        जेठी कीं हा मल्ल असे ।
लढू गजाशीं पडूं न खालीं
        ऐसा अंगीं जोम वसे ॥ ६ ॥
अशा रितीनें गंगाधर सुत
        जों जों विद्येमाजि चढे ।
तों तों पुढती काय करावें
        ऐसा येई प्रश्न पुढें ॥ ७ ॥

सरकाराची सेवा देवा म्हणति
नको तूं देउं मला ।
हेमशृंखळा गळा घातली
म्हणुनि म्हणावा काय भला ॥ ८ ॥
स्वातंत्र्याची मजा केवढी
ध्वजा सुखाची उभी करी ।
हरी करोनी प्रसाद त्यावर
कृपाछत्रही धरी शिरीं ॥ ९ ॥
अज्ञानानें देश आपुला
पडत चालला बहु मागें ।
वृत्तपत्र हें नवें काढुनी
नीट करूं या तरि जागे ॥ १० ॥
चिपळुणकरही तसेच होते
विष्णु शास्त्रिही मनिं आणा ।
स्वत्त्व राखणें तत्त्व तयांचें
जाणति सारे जनराणा ॥ ११ ॥
बी. ए. असुनी शिक्षक होते
रत्नागिरिच्या शाळेंत ।
मुक्त होउनी वेगें आले
देशभक्तिच्या मालेंत ॥ १२ ॥

फार करोनी विचार सारे
पटले दोघां नवे नवे ।
आनंदानें टिळक मिळोनी
सख्य जोडिती तयासवें ॥ १३ ॥
देशामाजी कधीं नसावें
अज्ञ एकही मूल ।
ऐशीं नवेंच केलें स्थापन
इंग्लिश स्कूल ॥ १४ ॥
पुढें केसरी काढुन केलें
अजरामर तें निज नांव ।
राजव्यसनीं दीन अनाथा
सुलभ जाहली नाव ॥ १५ ॥
आंग्ल ‘ मराठा ’ पत्र तयाची
कोण करी हो बरोबरी ।
बोल खोल ते डोलुनि म्हणती
मोल न त्याला खरोखरी ॥ १६ ॥
टिळकांचा तर हेतू नव्हता
राजकारणीं पडण्याचा ।
ओघें ओघें परंतु आला
दैवयोग तें घडण्याचा ॥ १७ ॥

ग्रंथ लेखनी हौस दांडगी
नसे रिकामी एक घडी ।
अतर्क्य तत्त्वें सुलभ रीतिनें
करुनि दाविती ते उघडीं ॥ १८ ॥
'ओरियान' हा ग्रंथ इंग्रजी
कोण न वाचुनि होय सुखी ।
पाश्चिमात्यहि पाहुनि त्यातें
नित्य घालिती बोट मुखीं ॥ १९ ॥
'आर्टीक होम' ही रचितां ज्यानें
वेद चाळिले सूक्ष्मपणें ।
विद्यादेवी प्रसन्न ज्याला
कोण तयाला उणें म्हणे ॥ २० ॥
विष्णू शास्त्री चिपळुणकर कीं
आगरकरही मित्र नवे ।
सख्य करोनि टिळक चालती
एक विचारें तयांसवें ॥ २१ ॥
आगरकर हे सुधारणेचे
कट्टे वादी महशूर ।
टिळक चालती जुन्यामतानें
नव्यापासुनी बहु दूर ॥ २२ ॥

आगरकरांचीं मतें पाहुनी
टिळक जाहले बहु खिन्न ।
मतामतांचा भेद वाढतां
झाले दोघेही भिन्न ॥ २३ ॥
टिळक ' केसरी ' स्वतंत्र लिहिती
राष्ट्रकार्य हा मनिं बाणा ।
नाम ' सुधारक ' पत्र काढिलें
आगरकरांनीं तइं जाणा ॥ २४ ॥
विष्णू शास्त्री अल्पवयांतचि
जातां सारे हळहळले ।
आपोआप ते परी लोकही
त्यांच्या मार्गाला वळले ॥ २५ ॥
"तिळभरि निंदा नसतां माझी
निंदा केली मनसोक्त ।
आगरकरांना टिळकांनाही
नसेंच करणें हें उक्त "॥ २६ ॥
कोल्हापुरचे दिवाण बरवे
यांची ऐशी फिर्याद ।
हायकोर्टामधिं येतां झाला
परस्परांचा बहु वाद ॥ २७ ॥

टिळक आगरकर दोघांनाही
        हर हर शिक्षा तरि झाली।
वाली घाली उडी न कोणी
        धैर्यानें संकट कालीं ॥ २८ ॥
कारागृहिंचे कष्ट सोसले
        दुःख न ज्यांना लेश मनीं।
सुटून येतां पत्रकार हे
        केला जयजयकार जनीं ॥ २९ ॥
वित्ति न देतां लक्ष तिळभरी
        चित्तीं सात्विक वृत्ति धरी।
नृपा न वाटो कृपा तयाची
        जपा तपाहुनि थोर तरी ॥ ३० ॥

## २

अधिकाऱ्यांचें वर्तन येई
        अनुचित ऐशा सदरांत।
त्याचा त्याचा निषेध करुनी
        माप घालिती पदरांत ॥ १ ॥
सरकाराचे घडती ते ते
        स्पष्ट दाविती गुणदोष।

म्हणूनि झाला अधिकाऱ्यांचा
टिळकावरती बहु रोष ॥ २ ॥
नवा कायदा 'डिफेन्स' केला
नसे तयाला धरबंद ।
टिळकावरती गाजवुनी तो
तोंड करीती जणु बंद ॥ ३ ॥
खरें दिसें तें पत्रीं लिहितां
सुधारकांशीं वाद जुपे ।
अधिकाऱ्यांवर टीका करितां
सरकाराला फार खुपे ॥ ४ ॥
राष्ट्रसभेचे खरे भक्त ते
कळकळ त्यांना खरी ।
राजकारणी करील सांगा
कोण तयांची बरोबरी ॥ ५ ॥
सुरतेमाजी कसा राहिला
छाती ठोकुन पुढें उभा ।
कैशी झाली सकल जाणती
सर्व लोकही राष्ट्रसभा ॥ ६ ॥
टिळकमताची लाट उसळतां
वाट मिळेना पळावया ।

उलट पक्ष तो सरशी पाहुनि
चित्तीं लागे जळावया ॥ ७ ॥
लोकहिताचा खरा कळवळा
होता जो कां टिळकांना ।
नाहीं त्याची अल्प कल्पना
हरहर त्यांच्या छळकांना ॥ ८ ॥
धनसुत दारा व्यर्थ पसारा
जन्मच सारा वाहीन मी ।
देशहितार्थे प्राणांतिकही
म्हणती मजला दुःख कमी ॥ ९ ॥
विद्वन्मंडित पंडित विजयी
कट्टे शोधक उद्योगी ।
निष्कामत्वें कर्म करोनी
धर्म जाणते जणुं योगी ॥ १० ॥
क्राफर्डाचा खटला होता
पडती मामलेदार बळी ।
'इन्डेम्निटिबिल' ॲक्ट करवितो
बुद्धीमाजी महाबळी ॥ ११ ॥
शाण्णव सालीं प्लेग व्यवस्था
झटले करण्याला फार ।

सरकारहि तैं खूष होउनी
मानी फारचि आभार ॥ १२ ॥
जाणून आला सरकारांतुन
'नामदार' हा बहुमान ।
दुर्दैवानें तेंच बदललें
पुढती सारें तरि मान ॥ १३ ॥
टिळकांचें जों देशभक्तिचें
लोकामाजी तेज चढे ।
तों तों सरकाराला त्यांचा
राजद्रोहच दिसे पुढें ॥ १४ ॥
टीकात्मक ते लेख वाचुनी
सर्व जनांना मोह पडे ।
अधिकारी तों म्हणती हातर
मोठा राजद्रोह घडे ॥ १५ ॥
अशा मिषानें टिळकावरि परि
पहिला खटला तरि केला ।
न्याय करोनी टिळक महात्मा
कारागारांतहि नेला ॥ १६ ॥
शांतवृत्तिनें वर्ष काढिलें
आटुनि गेलें बहुरक्त ।

रा. ५१०
८०



मोक्षमुळरें उक्त उपायें
केलें त्यांना तरि मुक्त ॥ १७ ॥
सरकार तृप्त न होय तशानें
शिक्षा झाली जरी तरी ।
राजद्रोही लेख म्हणोनी
वारंटानें पुन्हा धरी ॥ १८ ॥
मीच बोलतों म्हणे महात्मा
ब्यारिस्टरही नको मला ।
प्राशायाला तद्वचनामृत
लोकवृंदही बहु जमला ॥ १९ ॥
सप्रमाण तीं सर्व विधानें
सुंदर सुरगुरु समवाणी ।
सजा सांगतां प्रजा हळहळे
नेत्र घळघळ पाणी ॥ २० ॥
दावर साहेब बारिष्टरही
होते टिळकांचे आधी ।
भूषित केली पुढें तयांनीं
न्यायमूर्तिची परि गादी ॥ २१ ॥
पहिल्या वेळीं बोलत होते
टिळकांच्या जे पक्षानें ।

उलट दशेनें परी दुरी त्या
तीच तयांची कक्षानें ॥ ११ ॥
' सडला मेंदू पडला भ्रम हा '
टिळक तुम्हांला खरोखरी ।
वाग्बाणानें ताडण करिती
वरती त्यांना परोपरी ॥ १२ ॥
स्वस्थ व्हावया मस्तक ह्यांचें
हद्दपार हें पथ्य महा ।
म्हणून त्यांना मीही शासन
करितों वर्षें पहा सहा ॥ १४ ॥
धीरवीर गंभीर महात्मा
लेश न चित्तीं डगमगला ।
खळबळ छळ तो सोसुनि सारा
कारागारांतहि तगला ॥ १५ ॥
उभा राहुनी खड्या सुरानें
न्यायसभेच्या माझारीं ।
न्याय कराया समर्थ एकचि
बोले प्रभु दशअवतारी ॥ २६ ॥
येथें सारे ठरविति आहे
दोषाला मी जरि पात्र ।

तरी सांगतों खरी स्थिती मी
दोषी नाहीं तिळमात्र ॥ २७ ॥

यश येण्याला हाल अपेक्षा
माझ्या व्हाव्या हीच जरी ।
असे प्रभूची इच्छा तरि ती
करितों मीही वंद्य शिरीं ॥ २८ ॥

कर्मवीर मी धीर आपुला
परी कधीं नच सोडीन ।
आज उद्यां ना परवा तरिही
स्वराज्य अपुलें जोडीन ॥ २९ ॥

स्वजनहीन त्या विजनीं जाउन
वसतों आतां कोंडून ।
शब्द न पुढतीं निघेल माझ्या
लेखांतुन कीं तोंडून ॥ ३० ॥

सकल जनांना वंदुनि झाला
वंदिजन तो करी परी ।
नृपा न वाढो कृपा तयाची
जपातपाहुनि थोर तरी ॥ ३१ ॥

## ३

अमंगलांतहि मंगल किंवा
विषामधेंही सुधा असे ।
कारागृहही पावन झालें
तसें महात्मा ज्यांत वसे ॥ १ ॥
भाषा नाहीं आशा नाहीं
आप्त इष्टही नसे कुणी ।
सज्जन मज्जन होतां दुःखी
कोण तयाचा नसे ऋणी ॥ २ ॥
अनुज न कोणी मनुज न कोणी
अपुलें ऐसें कोण असे ।
वाचायाला पुस्तक नाहीं
कंठावे ते दिवस कसे ॥ ३ ॥
बोलायाला साधन नाहीं
फिरावयाला नसे मुभा ।
लेखन वाचन बंद पडोनी
विसरुन गेला शब्द सभा ॥ ४ ॥
उद्योगाची संवय दांडगी
अशी स्थिती ती कशी रुचे ।

खर्च न धैर्य तरीही
नवी कल्पना मनीं सुचे ॥ ५ ॥
धर्माचीही छान करुनी
कर्माचा बहु मान करी ।
ऐशी गीता रचूनि अमुच्या
भगवंतानें दिली करीं ॥ ६ ॥
गीता पाहुनि असंख्य भुलले
देव ऋषीश्वर मुनि योगी ।
विशद तिच्यांतिल रहस्य करितां
होइल फारच उपयोगी ॥ ७ ॥
गीतापुस्तक दौत लेखनी
साहित्याचीं हीं नांवें ।
लिहून म्हणती सरकाराला
इतकें तरि हें मज द्यावें ॥ ८ ॥
एकांताचा वास मिळाला
नसे काळजी मनिं घोर ।
श्रुति स्मृतींशी महामतीनें
कृती निर्मिली बहु थोर ॥ ९ ॥
वेदांताचा समुद्र मंथुनि
कर्मचि करणें हें सार ।

निश्चित केलें पाश्चात्यांचें
गुंफुनि तत्त्व विचार ॥ १० ॥
गीतेमाजी धर्म पाहतां
कर्मभाग हा मुख्य असे ।
सिद्ध करीती निषिद्ध आहे
त्याग सर्वथा उक्त नसे ॥ ११ ॥
'गीतारहस्य' अथवा ठेविति
'कर्मशास्त्र' हें नवनांव ।
भवसिंधूला पार कराया
तारक झाली जणुं नाव ॥ १२ ॥
टिळककृती मज खास वाटते
वेद व्यासाच्या सम ती ।
जडाजडांतिल खडा न ठेवी
भव्य दिव्य ती ती किती मती ॥ १३
परमार्थाचें साधन घडलें
गेला सुखमय तो काल ।
अजरामर तें टिळक होउनी
नांव राहिलें चिरकाल ॥ १४ ॥
एकुणविंशति सनामध्यें
त्या वर्षं आठवें असतांना ।

षड् वर्षांची शिक्षा झाली
हद्दपारिची टिळकांना ॥ १५ ॥
चवदा सालीं सुटून येतां
हर्ष वाटला कितीतरी ।
ध्वजा तोरणें लावुनि गाउनि
जनही जयजयकार करी ॥ १६ ॥
प्रेमानें जन वेडे होउनि
पेढे वाटिती चहूंकडे ।
कुंकुम मंडित सडे घालुनी
घडे ओतिती घरापुढें ॥ १७ ॥
अन्न घालुनी दीन अनाथा
प्रजा दाविती भक्ति खरी ।
दारू दीपोत्सव रात्रीचा
वर्णन त्याचें कोण करी ॥ १८ ॥
खुशाल आले टिळक आज
हा म्हणती सोन्याचा दिवस ।
दर्शन घ्याया किती लोटले
कोणी फेडिति कीं नवस ॥ १९ ॥
टिळक काढिती दौरा पुढती
लोक स्थिति ती पहावया

इष्ट साधण्या कष्ट न म्हणती
स्पष्ट जरी ते अशा वया ॥ २० ॥
जेथें जेथें गेले तेथें
अनुपम लोकप्रेम दिसें ।
रत्नालंकृत राजालाही
कधीं न कोणी असें पुसे ॥ २१ ॥
लोकमान्य हे येथें येती
शब्द पडे हा जंव कर्णीं ।
धाइच धाई उडोनि जाई
साऱ्या यवनादिक वर्णीं ॥ २२ ॥
गाडींतुन ते बाहेर येतां
हारतुऱ्याचा भार गळां ।
पुष्पवृष्टिनें दृष्टि न पडती
असा लागला जना गळां ॥ २३ ॥
घोडे सोडुनि ओढूं लागति
गाडी त्यांची भले भले ।
नेत्र जनांचे भरून येती
प्रेमाश्रूंच्या शब्द जलें ॥ २४ ॥
वाणी त्यांची विचारखाणी
निर्मल वाहे शब्दसुधा ।

ऐकुनियां ती बुधाबुधांना
कधीं न लागे तृषा क्षुधा ॥ २५ ॥
ईशकृपेनें वयास त्यांच्या
वर्षें होतां साठ पुरीं ।
जुबिली उत्सव करुनि साजरा
धन्य जाहली पुण्य पुरी ॥ २६ ॥
नोटांच्या किति मोटा बांधुनि
मोटारींतुनि बडे बडे ।
उल्हासानें धनिक पातले
भक्तांची तर झुंड पडे ॥ २७ ॥
झटती सारे द्रव्य द्यावया
वाव मिळेना परी करीं ।
झुगारुनियां वरुनि देती
सादर त्यांच्या शिरावरीं ॥ २८ ॥
पुरें पुरें ते म्हणती थोडें
लक्ष देउनी तरि ऐका ।
मला कशाला अर्पण करितां
उगाच तुमचा हा पैका ॥ २९ ॥
प्रेम देतां म्हणून घेतों
लाविन तो मी लोकहिता ।

स्वराज्य तुमचें तुम्हांस येइल
लौकर आतां भिऊं नका ॥ ३० ॥
फार जाहले अभार तुमचे
अधिक स्तुति ही नसे बरी ।
नृपा न वाटो कृपा तयाची
जपा तपाहुनि थोर तरी ॥ ३१ ॥

४

स्वराज्य घेण्यासाठीं जन्मुनि
आलें वाटे नररत्न ।
सर्वकालही हाल सोसुनी
करिती नानाविध यत्न ॥ १ ॥
विलायतेला जाउन तेथें
स्थिती आपली कळवावी ।
आँग्ल जनांना सांगुन अपुल्या
बाजुस चित्तें वळवावी ॥ २ ॥
ह्यास्तव आतां विलायतेला
जावें यावें पाहून ।
कोट करोनी बोट ठरविली
तुतिकोरिनला जाऊन ॥ ३ ॥

युद्ध चालुनि युरोप सारें
व्यापुन गेलें फार भयें ।
सरकाराचा हुकूम आला
ह्यास्तव तिकडे जाउं नये ॥ ४ ॥
जगांत जी जी घडे गोष्ट ती
दिसे दिसाया जरि अल्प ।
तरी तिच्यांतहि असे प्रभूचा
विशेष कांहीं संकल्प ॥ ५ ॥
टिळकांनीं जी जाण्यासाठीं
निश्चित केली बोट मुळीं ।
टार्पेडोचा लागुनि धक्का
तीही गेली रसातळीं ॥ ६ ॥
लोक ऐकुनी तयांस म्हणती
अनर्थ कैसा हा घडला ।
दैवें तुमच्या सरकाराचा
हुकूम पथ्यावर पडला ॥ ७ ॥
टिळक हांसुनी म्हणती अमुची
तींतच वसती असती ।
तरी ती अमुच्या पायगुणानें
खचित बुडाली नसती ॥ ८ ॥

चौदा महिने लंदन शहरीं
टिळकांनीं पुढें जाऊनी ।
सरकाराचा पक्षपात तो
सकल घातला कानीं ॥ ९ ॥
राहुनि तेथें राष्ट्रकार्यही
बरेंच केलेंसें गमतें ।
खेटे घालुनि भेटे त्यांची
अनुकुल केलीं लोकमतें ॥ १० ॥
चिरोल खटला विरुद्ध झाला
खर्चाचाही पेच वरी ।
'पर्सफंड' हा जमवुनि केली
लोकांनीं ती फेड तरी ॥ ११ ॥
परतुनि येतां विलायतेहुनि
मुंबापुरिचा थाट किती ।
पुष्पवृष्टिनें सृष्टिहि झाके
हार तुऱ्यानां नसे मिती ॥ १२ ॥
मानपत्रही अर्पण केलें
सर्व शहरच्या लोकांनीं ।
थोडें थोडें भाषण झालें
शब्द न पडला तरि कानीं ॥ १३ ॥

चंदाचंदी किती वदावी
मुंगीलाही रीघ नसे ।
नवें थवेच्या थवे दाटती
भरले आकाशीं घनसे ॥ १४ ॥
ध्वजा शशीची चढवुनि वेगें
आणुनि आपली मोटार ।
यवनबंधुही स्वागत करिती
प्रेम दाटलें अनिवार ॥ १५ ॥
यवन बंधुना म्हणती प्रेमें
तुमचें अमुचें ऐक्य घडे ।
पूर्वी कळतें तरि न जातों
सात समुद्रा पलीकडे ॥ १६ ॥
ऐसें बोलुनि घालुनिया तें
हाता माजी हात बरा ।
यवन बंधुच्या गाडीमाजी
बसोनि हर्षे येति घरा ॥ १७ ॥
पूर्वीच ताई महाराजांचें
प्रकरण संपुनि पुच्छ उरे ।
सर्वस्वी जय घेउन त्याचा
तेंही केलें सर्व पुरें ॥ १८ ॥

ह्मणून मुंबइ माजि पातले
भरला कालज्वर त्यांना ।
जिकडे तिकडे वृत्त पसरलें
चिंता लागे सकलांना ॥ १९ ॥
डॉक्टर आले अनेक तेथें
नाना साहेब देशमुख ।
जपतप करिती ब्राह्मण सारे
परी तयांना नसे सुख ॥ २० ॥
अधिक अधिक तें पाहुनि वाटे
सकलांच्याही मना धका ।
वाटेल मजला बरें उद्याला
टिळक सांगती भिऊं नका ॥ २१ ॥
मधें मधें परि शुद्ध जाउनी
बेशुद्धीची लहर उठे ।
क्षणक्षणीं तों सकल जनांचे
नेत्र भरोनि हृदय फुटे ॥ २२ ॥
श्रीकृष्णाचें चित्र दाउनी
पुसती आहे कोण बरें ।
'यदा यदा' हा श्लोक म्हणोनी
वंदन करिती अति त्वरें ॥ २३ ॥

मध्यरात्रिचा समय साधुनी
 एकांताची वेळ खरी ।
लोकमान्य वहु पुण्य पुरुष तो
 वैकुंठाची वाट धरी ॥ २४ ॥
हरहर तेव्हां काय वाटलें
 सांगायाला शब्द नसे ।
चिच्छक्तीचें भान जाउन
 वसले सारे स्तब्ध असे ॥ २५ ॥
रडावयाची उमखा नाहीं
 शब्द न तोंडांतूनि निघे ।
काय जाहलें आंत पहाया
 गर्दींतुन त्या कोण रिघे ॥ २६ ॥
दुःखाचा तो प्रकार पाहुनि
 हळुहळु सर्वांना कळलें ।
आकाशाची कुऱ्हाड पडली
 जाणुनि चित्तीं कळवळले ॥ २७ ॥
ढळढळ रडती पडती
 कितिक होउनी पाय लुले ।
केविलवाणी फिरतीं सारीं
 उदासवृत्ति स्त्रियां मुलें ॥ २८ ॥

बारा होतां तारावरती
तारा सुटल्या चहूंकडे ।
गांवोगांवीं वृत्त जाउनी
शोकसागरीं लोक बुडे ॥ २९ ॥
परमेशाचा कोप जाहला
झोप कशाची रात्रभरी
बरें वाटतें आज म्हणोनी
पुरजन होते स्वस्थ घरीं ॥ ३० ॥
दुःखसिंधुचा विषबिंदू तों
त्वरें येउनी शिरे उरीं ॥
नृपा न वाटो कृपा तयाची
जपातपाहुनि थोर तरी ॥ ध्रु० ॥

५

पुण्यांत सारी गडबड झाली
फारच हाहाःकार उडे ।
मुंबापुरचे तिकिट घ्यावया
जो तो धावे पुढें पुढें ॥ १ ॥
स्पेशल गाड्या निघती तेव्हां
एकामागुनि एक किती ।

त्या दिवसाची वर्णिल ऐसा
कोण जनाची मनस्थिती ॥ २ ॥
बाजार सारा बंद होउनी
एकच शून्याकार बने ।
अंत्यदर्शना साठिं जनांची
उत्सुक झालीं फार मनें ॥ ३ ॥
हांहां म्हणतां मुंबापुरतें
फुलून गेलें मनुजांनीं ।
हापापोनी धापा टाकित
आले सारे त्या स्थानीं ॥ ४ ॥
क्षुधा कशाची तृषा कशाची
देहभानही नसे मुळीं ।
जो तो आला सरदारगृह
हुडकित त्यांच्या मृतस्थळीं ॥ ५ ॥
आगष्टाची तारिख पहिली
एकुन विंशति वीस सन ।
लोकमान्यते प्रयाण करिती
सोडुनि सारे आप्त जन ॥ ६ ॥
भस्म लावुनी भाळा माळा
तुळसीच्याही बऱ्या गळां ।

शाल घालुनी बाल बसवितां
लेश न भासे प्रेतकळा ॥ ७ ॥
आसन मांडुनि ध्यान कराया
बसला वाटे जणुं योगी।
प्राण नेउनी ब्रह्मांडीं तो
ब्रह्मसमाधी सुख भोगी ॥ ८ ॥
लांब लांबचे लोक पातले
दोन वाजले तयारिला।
प्रथम पालखी उचलायाचा
पुणेकरांना मान दिला ॥ ९ ॥
ट्रामहि गेल्या बंद होउनी
वाट कोठची अश्वरथा।
पथावरोनी जाया न मिळे
मोटारीची काय कथा ॥ १० ॥
पुष्पवृष्टिच्या राशी पडल्या
सृष्टिंत त्यांना तोड नसे।
रौप्यमुद्रिका उधळुन देतां
भूमीवरती पेर दिसे ॥ ११ ॥
ब्राह्मण क्षत्रिय शूद्र पारशी
मुसलमानही भले भले।

अतिशूद्रादी सकल येउनी
स्मशानयात्रेला जमले ॥ १२ ॥
स्मशानयात्रा मिरवत मिरवत
वाजुन गेले तरी सहा ।
मागें चाले उदासीन तो
समाज सारा अहा पहा ॥ १३ ॥
शौकतअली खत्री येउन
खांदा देती अति त्वरें ।
सर्वांचेंही त्या समयाला
दिसून आलें प्रेम खरें ॥ १४ ॥
गांधी जन्मादास किंचलू
मिया महंमद छोटांनीं ।
ओढुनि भक्ति प्रेमचि आणी
येतील कां ते नोटांनीं ॥ १५ ॥
अफाट होतें वाळवंट तरि
भरून गेलें लोकांनीं ।
मुंगीलाही रिघ न ऐशी
गर्दी दोन्ही टोकांनीं ॥ १६ ॥
लालालजपतराय पातले
भक्ति तयांची खरी खरी

प्रेमभरानें शवास वंदुनि
अश्रु ढाळिले किती तरी ॥ १७ ॥
पाउस लागे तरी न मागें
सरे न कोणी रेसभरी ।
खुशाल भिजती जन येती तरि
एकामागुन एक सरी ॥ १८ ॥
चंदन काष्ठें चिता रचोनी
तूप ओतिती जळावया ।
उच्च सुरानें हाक देउनी
दुःखें लाविति अग्नि तया ॥ १९ ॥
अग्नीला तें खाद्य आपुलें
भक्षायाला वेळ किती ।
रक्षा होतां स्नानें करिती
लोक सर्वही यथा रिती ॥ २० ॥
पूर्वी झाला म्हणति न ऐसा
पुरुष न पुढती होय असा ।
कसा जनांच्या हृदयावरती
टिळक भक्तिचा ठसे ठसा ॥ २१ ॥
हाय हाय तो जाय महात्मा
अन्य तयाला कोण तुळे ।

वाली आपत्कालीं आतां
दुसरा आम्हा कोण मिळे ॥ २२ ॥
हरहर गेला काळें नेला
पुसूनि डोळे वरी वरी ।
आठवुनीयां सद्गुण सारे
लोकहि गेले घरोघरीं ॥ २३ ॥
थोडें तरि तें स्वराज्य अपुलें
हातीं आल्यावर जो कां ।
नको फलाची आशा म्हणुनी
जाय जणों कीं परलोका ॥ २४ ।
विद्या व्यसनीं वक्ता लेखक
निर्व्यसनीं तर खरा खुरा ।
जनहितकारी महा करारी
स्वार्थत्यागी असे पुरा ॥ २५ ॥
बुद्धिमंत तो अंत न लागे
पाहों जातां फार गुणी ।
उणीव नाहीं कधींच कोठें
धैर्याचा तर मेरु मणी ॥ २६ ॥
वेळ न दवडी कधींच वार्या
झिजवी काया देशहितीं ।

निजराज्याचा पाया रचतां
राायाचीही नसे क्षिती ॥ २७ ॥
पुण्य भुमीवर जन्मुनि आले
थोर महात्मे कितीतरी ।
अनेक रितिनें परि टिळकांची
होई न त्यानां बरोबरी ॥ २८ ॥
टिळकासम या लोकप्रियता
नच कोणाला मिळे कधीं ।
अजवरि झाले पुढेंहि होतिल
पुण्य पुरुष ते शतावधी ॥ २९ ॥
म्हणुनि वाटलें भावें गावें
चरित तयांचें अल्प मती ।
व्हावें व्हावें गिरवुनि कित्ता
लोकांनींही शीघ्र गति ॥ ३० ॥
केरळ कोकिळ कवनीं स्तवनीं
वर्णुनि त्यांना नमन करी ।
नृपा न वाटो कृपा तयाची
जपा तपाहुनि थोर तरी ॥ धृ० ।

REFBK 0019427

REFBK-0019427